# भरकटलेलं व्यक्तिमत्त्व

त्या दिवशी क्षमा जेवण झाल्यावर मागचे सर्व आवरुन दिवाणखान्यात आपल्या कुटुंबासह टी. व्ही. पहात होती. सिरियल चांगली असल्यामुळे सर्वजण त्यात रंगून गेले होते. एवढ्यात टेलीफोनची बेल वाजली. टेलीफोन सुमेधने-तिच्या मुलाने घेतला व तो म्हणाला .

"मम्मी, रमेश मामाचा फोन आहे." क्षमाने उठून फोन घेतला. रमेश सांगत होता-

"क्षमा, मी रमेश बोलतोय. ऐकतेस ना ! शरद भाऊच्या मोहितने आत्महत्या केली." क्षमाच्या पायातले बळच नाहीसे झाले, हे वाक्य ऐकून . ती पटकन जवळच्या खुर्चीवर बसली. क्षणभरात तिने विचारले-

"रमेश, अरे असं काय घडलं ? मोहित इतका शांत मुलगा. तसा भित्राच , आत्महत्या करण्याचं धाडस त्याचं कसं झालं ?" क्षमाचा आवाज गहिवरला होता. डोळे अश्रुंनी तुडूंब भरले होते.

"अगं काहीच कळलं नाही. आम्ही सर्वजण त्या बाबतीत अंधारातच आहोत. शरद-मेघाला देखील कारण माहीत नाही. आम्ही आत्ताच विद्युतदाहिनीतुन परतलो आणि तुला फोन केला.

"काय झालं गं क्षमा ? रमेशने फोनवर काय सांगितले ?" अच्युतने विचारले.

"अहो, मोहितने आत्महत्या केली. किती सालस, सरळ स्वभावाचा मुलगा ! आत्महत्या करण्याचे धाडसच त्याच्या जवळ नव्हते," क्षमाने सांगितले.

"अगं, काहीतरी तसंच कारण घडलं असणार. त्याच्या मनाला लागणारी घटना घडली असेल. चल, लवकर आवरआवर कर. आपल्याला सांगलीला जावे लागेल,"अच्युत म्हणाला.

"होय, जायला पाहिजे. पण राहून राहून मोहितचा निरागस चेहरा डोळ्यापुढे येतो आणि वाईट वाटतं बघा." क्षमा म्हणाली. वारंवार तिचे डोळे भरुन येत होते. तिच्या डोळ्यासमोर मोहितच्या जन्मापासूनच्या एक-एक घटना येऊ लागल्या.

मोहितच्या जन्माच्या वेळी सर्वांना खूपच आन्द झाला होता. ब-याच वर्षानंतर या घरात बाळाची कोमल, मृदू पावले खेळणार होती, त्याचा आनंद तर होताच. पण पहिलाच मुलगा झ ााल्याने दुधात साखरच पडली होती. गोरापान, गुटगुटीत मोहित सगळ्यांचा लाडका होता. शरद आणि मेघा दोघांनाही नोकरी वर जावं लागे. शरद एका नावाजलेल्या कंपनीत चांगल्या पोस्टवर काम करीत असल्याने, त्याला पगार चांगला होता. मेघाही सेंट्रल गव्हर्मेंटच्या सर्व्हिसमध्ये होती.

त्यामुळे घरात सुबत्ता होती. शरदच्या घरात त्याची एक विधवा आत्या रहात होती. ती घरातलं सर्व पहात असल्यामुळे शरस आणि मेघाला मोहितच्या कोणत्याच बाबतीत चिंता करावी लागत नव्हती. ती मोहितला न्हाऊ घालण्यापासून सर्व कामे आपुलकीने करीत होती. बघता बघता मोहित मोठ्ठा झाला. S.S.C.ला त्याला ९०% मार्क्स् पडले . शरदने त्याचे खूप कौतुक केले. सर्व कॉलनीला, ऑफीसला पेढे वाटले सर्वत्र आनंदी आनंद झाला.

मोहित कॉलेजला गेला आणि त्याच्यात हळूहळू बदल होऊ लागला. पॉकेटमनी भरपूर मिळत असल्यामुळे त्याच्याभोवती वाईट मित्रांचा गोतावळा जमला. त्याला सिगरेटचेहि व्यसन लागले. पण हा बदल लक्षात येण्याइतके शरदचे घरात लक्ष नव्हते. संध्याकाळचा स्वयंपाक मेघाकडे असल्यामुळे ती ऑफिसमधून आली की, हातपाय धुवून चहा, खाणे व संध्याकाळच्या तयारीला लागे. सर्व उरकेपर्यंत तिला ११च वाजत आणि सकाळी लवकर उठायचे म्हणून ती झ ोपायला निघून जाई. आत्याबाईंचेही आता वय झाले होते. त्यांच्याकडून जास्त काम होत नव्हते म्हणून मेघाला सकाळी बरीचशी कामे उरकावी लागत. तिचीही फार धावपळ होई.म्हणून मोहितमधला बदल तिच्याही लक्षात आला नव्हता. आत्याबाईंना मात्र मोहितमधला हा बदल खटकत होता. पण त्या काही बोलू शकत नव्हत्या. तरी त्या एकेदिवशी शरदला म्हणाल्याच-

"अरे शरद, एकदा मोहितच्या कॉलेजात तरी जाउन ये तो नियमित कॉलेजला जातो की नाही. त्याचे मित्र कोण आहेत याची चौकशी कर. "

" आत्याबाई, तुम्ही उगीच काळजी करता. तो अभ्यास करतो ना नीट? " शरद म्हणाला. आत्याबाई गप्प बसल्या. पण त्यांच्या मनात हुरहूर लागली होती. अनिष्टांची चाहूल त्यांच्या सहाव्या इंद्रियाने त्यांना दिली होती.

आणि मोहित अभ्यास करतो हा शरदचा भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला. त्याच्या कॉलेजचे कार्ड आले होते. मोहित ब-याच दिवसापासून कॉलेजलाच गेला नव्हता. शरदच्या रागाचा पारा चढला. त्यावेळी मोहित घरी नव्हता. रात्री तो केव्हातरी येऊन झोपला. सकाळी उठून शरदने त्याला करड्या आवाजात हाक मारली-

"मोहित इकडे ये." पप्पांचा रागीट आवाज ऐकून मोहित घाबरला. भीत भीत शरदपुढे येऊन तो खाली मान घालून उभा राहीला.

"मोहित, तू कॉलेजला रोज जातोस ?" शरदने विचारले.

"होय पप्पा." मोहित उत्तरला.

"मग हे कार्ड कसे आले ? गेले दोन महिने तू कॉलेजला गेला नाहीस असे यात लिहिले आहे."मोहित खाली मान घालून गप्पच.

"अरे बोल की मुर्खा ! दातखीळ बसली का तुझी ? हे कार्ड खोटं आहे का ?" असे म्हणून शरदने एक थप्पड मोहितच्या गालावर ठेवून दिली. गो-यापन मोहितच्या गालावर उमटलेली पाहून आत्याबाईच्या पोटात तुटले, पण शरदसमोर फारसं काही बोलण्याची त्यांची हिंम्मत नव्हती. मोहित डोळ्यातले अश्रू आतल्या आत गीळण्याचा प्रयत्न करीत होता.

"गाढवा, मी कोणाशी बोलतो आहे ? उत्तर देता येत नाही का तुला ? अरे तुमच्या सुखसोयीसाठी आम्ही मरमर राबतो, त्याची काहीतरी जाणीव ठेव. आम्ही ज्या अडचणी सोसल्या, कष्ट भोगले ते तुम्हाला भोगावे लागू नये म्हणून आम्ही धडपडतो. पण तुमचं आपलं तिसरंच !" शरदचा राग अजून ओसरला नव्हता.

"पप्पा, मला कॉलेजात विषय समजत नाही," मोहित धीर करुन म्हणाला. "हजर राहीलेस तर समजेल ना ? समजले नाही तर सरांना विचार. पण या पुढे कॉलेज बुडवलेस तर माझ्यासारखे वाईट नाही. " शरदने अंतीम इशारा दिला.

मोहितची अडचण खरीच होती. शाळेत असेपर्यंत शिक्षक व्यवस्थित स्मजावून देत. समजलं का याची पुन: पुन: प्रश्न विचारू न खात्री करुन घेत. आणि त्यांना अडचणी विचारायला मुलांना संकोच वाटत नसे. पण कॉलेजातील त-हा वेगळीच होती. प्रोफेसर लेक्चर देऊन निघून जात. मुलांना समजलं की नाही याची त्यांना पर्वा नसे. मुलांना या नवीन वातावरणात प्रोफेसरांना डिफिकल्टी विचारण्याची भितीही वाटे. त्यामुळे समजले नाही, तरी ते गप्पच बसत. मोहितच्या मित्रांचे आईवडील त्यांना त्यांच्या अडचणी विचारत. स्वत: समजावून देत, नाहीतर ट्यूशन लावत. पण मोहितला ट्यूशन लावा म्हणण्याचीही हिम्मत नव्हती.

शरदची त-हा वेगळीच होती. मुलांना खायला-प्यायला भरपूर दिले, कपडे-पुस्तकेआणून दिली की, तो स्वत:चे कर्तव्य पार पाडले असे समजे. कॉलेजात तो काय करतो, त्याला विषय समजला की नाही हे जाणून घेण्याची त्यालागरज भासत नव्हती. त्याला वाचनाचा अतिशय नाद. त्यामुळे घरी आला की तो पुस्तकात डोकेखुपसून बसे. तो बातम्या ऐकायलाच पुस्तक खाली ठेवी. नंतर थोडावेळ टी.व्ही. वरचे कार्यक्रम बघतच जेवण घेई. त्यावेळी कधी मोहित हजर असे,

कधी नसे. खरे पाहिले तर संध्याकाळच्या जेवणाच्या वेळी सर्व कुटुंब एकत्र आले तर ब-याच समस्या सुटू शकतात. त्यावेळी खेळीमेळीने दिवसभरात आपण काय केले हे सर्वजण एकमेकाला सांगू शकतात. मुलेही आपल्या अडचणी सांगतात. मग पालक त्यावर कशी मात करावी हे सांगतात. अभ्यास कसा करावा याचेही मार्गदर्शन करतात. त्यामुळे मुले आणि पालक यांच्यात सुसंवाद राहतो. मुले पित्याला घाबरत नाहीत. आपल्या चुका सांगायला संकोचत नाहीत. आत्याबाईंना फार वाटायचे सर्वांनी जेवणाच्या वेळी एकत्र यावे. त्यांनी एक-दोनदा सुचवूनही पाहिले . पण तिकडे कोणी लक्ष दिले नाही. आत्याबाईंचा या नातवावर फार जीव होता. तो चांगला शिकावा, चांगल्या मित्रात रहावा असे त्यांना वाटे. घरात तो आत्याबाईंशीच मोकळेपणे बोलत असे. त्या दिवशी शरदने मारल्यापासून तो घुमाच झाला. पप्पांनी सर्वासमोर त्याचा अपमान केला, हे त्याच्या मनाला फार बोचले. एरव्ही आपले परोपरीने लाड करणा-या पप्पांनी आपल्याला मारावं याचा त्याला अपमान वाटला. अभ्यास समजत नाही म्हणून कॉलेजात जायचे नाही आणि कॉलेजात न गेल्याने पुढचे काहीच समजत नाही, असे हे व्हिशियस सर्कल होते. त्याला आठवले एकदा आपण मोठ्या उत्साहाने पप्पाजवळ गेलो आणि लाडीकपणे म्हटले-

"पप्पा, मला एवढे समजावून द्या ना !"

"मला वेळ नाही बघ. मला पुस्तक वाचायचे आहे. आत्ताच मी दमून भागून ऑफिसातून आलोय. तुझी कटकट माझ्या मागे नको. तुझ्या सरांना विचार जा. नाहीतर मित्रांच्या वहीत बघ," पप्पांनी त्याला धुडकावले. मोहित हिरमुसला होऊन निघून गेला. शरदचे आयुष्य तसे कष्टात गेले. नोकरी करुन त्याने नाईट कॉलेज करुन डिग्री मिळविली. पुस्तकेदेखील घेण्याची ऐपत नव्हती. मित्रांची पुस्तकेआणून रात्र-रात्र त्याला अभ्यास करावा लागला. त्यामुळे मोहित अभ्यासाचा बाऊ करतो असे त्याला वाटे. पण त्यावेळचे वातावरण आणि आत्ताचे वातावरण याची तुलनाच होऊ शकत नाही, याची त्याला कल्पना नव्हती. कुंडीत नाजुकपने वाढवलेले रोपटे आणि माळरानावर आपोआप वाढणारे रोपटे यातला फरक शरदला कळलाच नाही. आणि अनवधानाने मोहितकडे दुर्लक्ष झाले. यात त्याची चूक होती असेही म्हणता येणार नाही. किंवा त्याचे मोहितवर प्रेम नव्हते असेही म्हणता येणार नाही. फक्त बदलत्या परिस्थितीशी त्याला सुसंवाद साधता आला नाही. एवढेच फार तर त्याची चूक झाली असे म्हणावे लागेल. आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे मोहित वार्षिक परीक्षेत नापास झाला.

घरात सर्वांनाच वाईट वाटले. ९० % मार्क मिळविणा-या मोहितला पासापुरते मार्क्स का मिळविता आले नाही, याच्या मागची कारणे जाणून घेण्याची गरज भासली नाही. ज्या मुलांत मोहित मिसळत होता त्यांना हा श्रीमंत बापाचा मुलगा आहे हे माहीत होते. त्यांनी त्याला हॉटेलिंगसाठी , सिगरेटसाठी पैसे मागण्यास सुरवात केली. पण मोहितचा पॉकेटमनी भरपूर असला तरी तो त्याच्या एकट्यापुरता. मित्रांना रोज खाऊपिऊ घालणे त्याला शक्य नव्हते. त्यामुळे त्याने हळूहळू मित्रमंडळीत जाणे कमी केले. घरीच वाचत बसे किंवा टेरेसवर एकटाच फे-या मारीत बसे. आत्याबाई विचारत,"का रे मोहित, बरं नाही का ? आज मित्राबरोबर गेला नाहीस फिरायला ?"

"नाही गं आजी. आज घरीच वाचत बसतो," मोहित उत्तर देई . आत्याबाईंना मोहितचा कोंडमारा होतो हे कळत होते. पण त्याच्या मागची कारणे समजून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. त्या पोरासाठी त्यांचा जीव तुटत होता. त्यांना त्याची काळजी वाटत होती. मेघालाही मोहित बद्दल वाईट वाटत होते. पण तिचा दृष्टीकोन वेगळा होता. माझ्या सर्व मैत्रिणींची मुले चांगल्या मार्कांनी पास होतात. माझ्याच पोटी असा हा दिवटा का जन्मला या बद्दल तिला वाईट वाटत होते. आपण याला कशाला कमी करत नाही. तोंडातून निघेल ती फर्माईश पुरी करतो. मग याने अभ्यास का करू  नये या बद्दल ती दु:खी होती. कॉलेज सुरु व्हायची वेळ झाली तेव्हा मोहितने स्पष्ट सांगितले-

"मम्मी, मी जाणार नाही. मला शिकण्यात इंटरेस्ट नाही."

"अरे मग तु करणार तरी काय ? या लहान वयात, अपु-या शिक्षणाने तुला नोकरी तरी कशी मिळणार ?" मेघाने विचारले.

"मम्मी, मी नोकरी करणार नाही. मला बिझनेस करायचा आहे. मला एक दुकान घेऊन द्यायला सांग पप्पांना. मी इलेक्ट्रॉनिक्सचे दुकान टाकीन," मोहितने आपला विचार सांगितला. मेघाही रात्री शरदजवळ बोलली. सकाळी ऑफिसला जाण्यापुर्वी शरदने मोहितला बोलावून घेतले आणि तो म्हणाला-

"मोहीत, तुला बिझनेस करायचा आहे, असं तुझी मम्मी म्हणते. खरं आहे का ते ?"

"होय पप्पा, मला पुढे शिकायचं नाही ."मोहित म्हणाला.

"अरे तू अजून लहान आहेस. कॉलेजमध्ये जा. नीट अभ्यास कर. ग्रॅज्युएट हो. मग काय करायचं ते कर. बिझनेस म्हणजे तोंडच्या गोष्टी नव्हेत. त्यासाठी जागा पाहिजे. भांडवल पाहिजे. दिवसभर चिकाटीने बसणे तुला जमणार नाही. आणि आता तरी मला एवढा पैसा धंद्यात घालणे योग्य वाटत नाही. मला तर दुकानाकडे बघायला मुळीच वेळ नाही. दिवसभर मी किती बिझी असतो तुला माहितच आहे. दुसरे कोण आहे आपल्याकडे. एकट्याच्या जीवावर धंदा होत नाही. "शरदने मोहितला समजवण्याचा खूप प्रयत्न केला. मम्मीने, आत्याबाईने देखील त्याला समजावले. पण तो पुन्हा कॉलेजला जायला तयार नाहीच झाला.

एक गॉन केस म्हणून शरद व मेघाने त्याच्याकदे लक्ष देणे सोडून दिले. तो घरात केव्हा येतो केव्हा जेवतो, झोपतो याची त्यांनी चौकशी करणेही सोडून दिले. या सर्व गोष्टी पाहून आत्याबाईंना मात्र फार दु:ख झाले. दोघे कमावतात. काय झालं असतं, एखादा धंदा त्याला काढून दिला असता तर. एकुलता एक मुलगा आहे. झालं असतं समजा थोडं नुकसान. पण त्यातून काही ज्ञान तरी मिळालं असतं. शेवटी हे दोघे कमावतात, त्या पैशाचा वारस तर मोहितच आहे. नाहीतर शरदने त्याला एखादी छोटी मोठी नोकरी लावून द्यावी. मुलगा गुंतून तरी राहील. रिकामं मन सैतानाचं घर असतं. काय होणार या पोराचं देव जाणे.

शरद आणि मेघा त्यांच्या कामात गुंतलेले होते. ते दोघे अनेक कार्यक्रमांना जात पण मोहितला कोठेच नेत नसत. एवढा मोथा मुलगा काही शिकत नाही, उद्योग करीत नाही याचे त्यांना वैषम्य वाटे आणि लाजही वाटे. शरद्च्या बहिणीकडे लग्न होतं मुलाचं. शरदचे मेहुणे येऊन सर्वांना आमंत्रण देऊन गेले. मोहितलाही त्यांनी येण्यासंबंधी सांगितले. शरदलाही मोहितला घेऊन येण्यासंबंधी बजावले. मोहित खुश होता. त्याला ब-याच दिवसांनी आत्याकडे जायला मिळणार होते. आत्याच्या मुलाचं त्याचं चांगलं जुळत असे. त्या घरी तो सगळ्यात मिसळून जाई पण लग्नाला जायला शरद आणि मेघा दोघेच निघालेले पाहून त्याने शरदला विचारले-

"पप्पा, मी येऊ आत्याकडे लग्नाला?"

"नको. आम्ही दोघेच जाऊन येतो, " शरदने उत्तर दिले.

"पप्पा, मामांनी मलाही आग्रहाने बोलावलं आहे. माझीही सगळ्यांना भेटण्याची इच्छा आहे," मोहितने चिकाटीने विचारले.

"तुला घेऊन जाण्याची मला लाज वाटते. हा काय करतो म्हणून विचारले तर मी काय उत्त्र देऊ ? तुझ्यामुळे मला मान खाली घालायची पाळी येते," शरद म्हणाला. त्याचं हे बोलणं आत्याबाईंना मुळीच आवडले नाही. त्या म्हणाल्या-

"शरद, येऊ दे ना त्याला. पोरगा घारत बसून कंटाळला आहे.चार दिवस हवा पालट होईल. बरं वाटेल त्याला."

"काही नको. मी सांगितलं कां त्याला घरात बसायला ? तुम्ही नका बाजू घेऊ त्याची," असे म्हणून शरद बाहेर निघून गेला. लग्नाला दोघेच निघून गेले.

या घटनेने मोहित जास्तच अंतर्मुख झाला. माझं जगणं व्यर्थ आहे. माझ्यामुळे आईवडीलांना मान खाली घालावी लागते. माझी त्यांना लाज वाटते.मी त्यांच्या जीवावर फुकट खातो, शिकत नाही म्हणून त्यांचा माझ्यावर राग आहे. पण मला शिक्षअणाची रू ची नाही. मला थोडसं भांडवल दिलं असतं पप्पांनी तर माझा धंदा सुरू झाला असता. मीही दिवसभर दुकानात गुंतून राहीलो असतो. माझ्या अपु-या शिक्षणामुळे मला चांगली नोकरीही मिळणार नाही. छोटी मोठी नोकरी केली तर पप्पांच्या प्रतिष्ठेला शोभणार नाही, म्हणून ते चिडतील. मी काय करू ? मला काहीच समजेनासे झाले आहे. या घरात सर्वांना माझी अडचणच होते. घर सोडून निघून जावेसे वाटते. पण खायचं काय ? रहायचं कुठे ? सर्व प्रश्न समोर उभे राहतात. उत्तर एकही सापडत नाही. अश्याप्रकारचे उलट सुलट विचार त्याच्या मनात पिंगा घालू लागले. त्याचे खाणेही तुटले.

शरद, मेघा लग्नातून आले ते खुशीतच तो आत्याबाईंना म्हणाला- "ताईच्या घरचं लग्नं छान झालं. सुनही चांगली शिकलेली देखणी आहे. ताईच्या सुहासला शोभेशी आहे. सुहासही देखणा आहे. का नाही मिळणार त्याला चांगली बायको ? ताई अगदी खुष आहे. नाहीतर आमचा दिवटा बघा."

आनंदाच्या प्रसंगीसुद्धा शरदने मोहितचा उपहास करणे सोडले नाही. मोहितच्या मनाला ही गोष्ट लागली. पुन: त्याच्या मनात खळबळ उठ-सूठ अपमानित करणा-या या जिण्यात काय अर्थ आहे ? कशाला जगतो आपण ? कां राहतो या घरात ?पप्पांना, मम्मीला जर आपला एवढा तिरस्कार वाटतो, तर कोठेतरी निघून जावे. किंवा, आत्महत्या करू न हे जीवनच संपवावे ! पण आत्महत्या करण्याचं धैर्य माझ्यात नाही. फार भित्रा आहे मी ! उलट सुलट विचारांनी त्याचे डोके

भणभणू लागले. पण एकेदिवशी दुपारी त्याने मनाचा निश्चय करू न खोलीला आतून कडी घातली आणि गळफास लावून घेतला.

त्याच्या मनातील या विचारांची कोणालाच कल्पना नव्हती. थोडं वाकडं बोललं तर त्याच्या जिद्द जागृत होऊन तो अभ्यासाला लागेल असा शरदचा विचार. पण आपल्या बोलान्याचा असा विपरीत परीणाम होईल याची त्याला कल्पना नव्हती. असा आततायीपणाचा निर्णय मोहित घेईल याची त्याला तिळमात्र कल्पना नव्हती.

आत्याबाई दुपारी झोपून उठल्या. त्यांनी चहा ठेवला . आणि मोहितला हाक मारली- "मोहित, चहा घ्यायला ये."

काहीच उत्तर आले नाही. म्हणून त्यांनी दार ठोठावले तरी आवाज आला नाही. त्यांनी दारावर धडका द्यायला सुरुवात केली. तरीही आवाज येईना, तेव्हा त्या घाबरल्या . काय करावे हे त्यांना सुचेना. शरद येईपर्यंत थांबणे भागच होते. शरद आला तेव्हा रडवेल्या झालेल्या आत्याबाईंना त्याने विचारले,"आत्याबाई, काय झालं ? तुमचा चेहरा असा का दिसतो ?"

"शरद, मोहित दाराला कडी घालून आत झोपला. कितीही हाका मारल्या, दारावर धडका मारल्या तरी तो ओ देत नाही. माझा जीव घाबरुन गेला आहे. " शरद्ने दारावर जोरात धक्के दिले. पण दार उघडले नाही. शेवटी त्याने सुताराला बोलावून दार फोडले तर आत मोहितचा अचेतन देह पंख्याला लटकत असलेला पाहून आत्याबाईंनी हंबरडा फोडला.